महाराष्ट्र शासन

क्रमांक: व्हीएलएस-१०९४/[७४५०]प्राशि३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक : १७ ऑगस्ट, १९९४

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,

विषय :- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत..

========================================

सोबत जोडलेल्या यादीमधील शैक्षणिक संस्थांना जून, १९९३ पासून इयत्ता १ ली ते १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात सुरु असलेल्या वर्गासह इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटींसह तसेच परिशिष्ट "अ" मधील विहित अटी व शर्तींवर शासनाची परवानगी देण्यात येत आहे. तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सक्षम अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. सदर शाळांच्या शासनमान्यतेबाबतचा योग्य निर्णय सक्षम अधिकाऱ्यांनी २ महिन्यात करणे आवश्यक आहे.

[ प्र. कृ. सगदेव ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षणाधिकारी, [प्राथमिक], जिल्हा परिषद,
३. प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ,
४. निवड नस्ती
५. मा. मंत्री शालेय [illegible] यांचे खाजगी सचिव,
६. मा. राज्यमंत्री [illegible] यांचे खाजगी सचिव

यांना माहितीसाठी अग्रेषित.

१०] संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

११. शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

१२. शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढीलवर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिका-यांकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात] करणे बंधनकारक राहील, अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

शिक्षण उपसंचालकांनी संबंधित संस्थेस सक्षम अधिका-यांमार्फत यथानियम शासनाची परवानगी कळविण्यापूर्वी खालील बाबी प्रामुख्याने पडताळाव्यात.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेस कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

.....३.....

(3)

## परिशिष्ट "अ"

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्यांचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

१. सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२. शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकुल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३. शाळेत, शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

४. संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थीत चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

५. संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

६. संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

७. संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा, नियमीतपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

८. संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

९. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

...२/

माध्यमाच्या

जून, १९९३ पासून इंग्रजी ~~माध्यमाच्या~~ प्राथमिक शाळांना परवानगी

जिल्हा-ठाणे शा. प. क्र. व्हीएसएस-१०२४/(७४५०)प्राशि-३, दि.१७.८.९४ चे सहपत्र.

| संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|
| १] शिव छत्रपती विद्या प्रसारक मंडळ, खारबाव परिसर, ता. भिवंडी. | कालवार, ता. भिवंडी | इंग्रजी. |
| २] लॉर्डस एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई. | विरार | इंग्रजी |
| **जिल्हा-नाशिक** | | |
| १] श्री. एज्युकेशन सोसायटी पडकी देस, सिन्नर जि. नाशिक | सिन्नर | इंग्रजी |
| **जिल्हा-जळगाव** | | |
| १] सेंट टेरेसा कॉन्व्हेंट, जळगाव | आदर्शनगर, जळगाव. | इंग्रजी |
| २] उज्वल एज्यु. ट्रस्ट, पारेखवाडी गणपतीनगर, जळगाव. | जळगाव | इंग्रजी |
| **जिल्हा-पुणे.** | | |
| १] स्वप्नदिप एज्यु. सोसायटी न्यू. कोपरे, पुणे | न्यू. कोपरे. ता. हवेली | इंग्रजी |
| २] श्रीशिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड, ता. पुरंदर | जेजुरी ता. पुरंदर. | इंग्रजी |
| ३] दी मलंकारा कॅथलिक असोसिएशन, काळेवाडी, पुणे. | काळेवाडी पुणे | इंग्रजी |
| **जिल्हा-सोलापूर** | | |
| १] महावीर शिक्षण संस्था, सोलापूर | होटगीरोड, सोलापूर. | इंग्रजी |
| **जिल्हा-रत्नागिरी** | | |
| १] बुरोंडी करजगाव, लाडघर पंचक्रोशी शिक्षण संस्था, करजगाव, ता. दापोली, जि. रत्नागिरी | करजगाव, ता. दापोली | इंग्रजी |

८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.

११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १०.०० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे, ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १०.०० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

---

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- २०.९.९४

प्रति,

~~दी मलंकारा कॅथलिक असोसिएशन~~
काळेवाडी, पुणे

(6)

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासन शालेय शिक्षण विभागाकडील क्र. व्हीएलएस-१०९४/[५५४०]/प्राशि-३ दि. ~~१२.४.९४~~ १५.८.९४

वरील विषयाचे संदर्भाधीन शासनाकडील संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या काळेवाडी या ठिकाणी खाजगी प्राथमिक शाळेस ~~मराठी~~/इंग्रजी माध्यमातुन सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षी परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र ही परवानगी शासनाने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होत असल्यासच शासनाने दिलेली असल्याने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होते किंवा कसे याबाबतचा अहवाल आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी[प्राथमिक] जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. यांचेकडे विनाविलंब सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयाकडे परस्पर सादर करावी. म्हणजे परवानगी देणेबाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयास करता येईल.

१] संबंधित संस्था, संस्थानोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत करावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

..२..

8



५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७] शासनाची मंजुरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे. आहे

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहीत मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०] शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरु असलेले वर्ग व त्यातील विद्यार्थी संख्या कळवावी.

११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संस्था उघडणार नाही असे संस्थेने रु.१०/-च्या स्टँप पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२] शासनाने ज्या माध्यमातुन शाळा काढण्यास परवानगी देण्यात येणार आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संस्था/शाळा उघडणार नाही याची हमी रु.१०/- च्या स्टँप पेपरवर द्यावी.

१३] संस्थेस जया वर्षि शाळेस परवानगी द्यावयाची आहे त्यावर्षी संस्थेने शाळा सुरु न केल्यास शाळेच्या नूतणीकरणासाठी अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शाळेस द्यावयाची परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतणीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

वरील अटींची पूर्तता होत असलेबाबतची माहिती सर्व कागदपत्रांसह शिक्षणाधिकारी [प्राथ]जिप/प्रशासन अधिकारी न.पा.शि.मं. यांचेकडे त्वरित सादर करावी. म्हणजे पुढील कार्यवाही त्वरित करता येईल.

सही/-

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत-माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

१] शिक्षणाधिकारी[प्राथमिक]जिल्हा परिषद, पुणे विभाग

२] प्रशासन अधिकारी, न.पा.शि.मं. पुणे विभाग.

त्यांनी शाळांकडून पूर्तता होत असल्याबाबतचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

सही/- [illegible]
शिक्षण उपसंचालक

24

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/ ९७
पुणे, दि. १७/६/९७

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

निर्मल बेथानी हायस्कूल, कळवाडी
पुणे ९७

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९७-९८, इ.६ वी, ७वी, ९वी, १०वी.

आपल्या दि मालनकर कॅथॉलिक असोसिएशन द्वारा संचालित निर्मल बेथानी हाय कळवाडी या माध्यमिक शाळेतील इ.८वी/ ५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९५ - ९६ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य २(क)/नमाशा/मान्यता/पुवि/९५ दि. ३१/५/९६ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९७ - ९८ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, ७ वी, ९ वी, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात सांकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे भरून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(सही)

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.